# डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

**अत्यंत महत्वाचे**

क्र.बीजीए/पेन्शन/माहिती/११/२०२५
दिनांक: २६ नोव्हेंबर, २०२५.

प्रती,

______________________________

______________________________

______________________________

(सर्व कार्यालये )

विषय : **विद्यापीठातंर्गत काम करीत असणारे अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वयाबाबतची माहिती.**

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या आस्थापनेवर काम करीत असणारे अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वयाला दिनांक ०१-०१-२०२७ ते ३१-१२-२०२७ या कालावधीत त्यांचे वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण होत असतील किंवा या अगोदरच पूर्ण केली असतील असे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे वयाबाबतची माहिती पत्रासोबत जोडलेल्या **'अ'** व **'ब'** विवरण पत्रामध्ये भरुन ती कोणत्याही परिस्थितीत या कार्यालयास दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत प्राप्त होईल या बेताने पाठवावी.

कर्मचा-याचे वयाचा हिशेब करतांना, त्याचे मुळ सेवा पुस्तकात नोंदविलेली जन्म तारीखच विचारात घ्यावी. जर काही कर्मचा-यांनी आपली जन्म तारीख विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक बीजीजी/१२७२, दिनांक १२-९-१९७२ नुसार बदलविल्याबाबत अर्ज केला असेल तर याबाबतची माहिती विवरण पत्राच्या रकाना क्रमांक ८ (आठ) मध्ये स्पष्ट नमूद करावी. परंतु रकाना क्रमांक ५ (पाच) मध्ये कर्मचा-यांची जन्मतारीख ही त्यांचे सेवापुस्तकात नोंदविलेल्या जन्म तारखेप्रमाणे (आधारेच) असावी व त्याच जन्म तारखेच्या आधारे वयाला ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण होण्याची अथवा अगोदरच पूर्ण झाल्याची तारीख काढून ती रकाना क्रमांक ७ (सात) मध्ये नमूद करावी. तसेच **कर्मचा-याचे नांव लिहितांना संपुर्ण नाव लिहावे.** (संक्षिप्त स्वरुपात नाव लिहू नये.)

..२/

तसेच ज्या कर्मचा-यांची नियुक्ती दिनांक ०१ नोहेंबर २००५ नंतर झालेली आहे आणि **ज्या अधिकारी/कर्मचा-यांना 'परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना' लागु करण्यात आलेली आहे अशा अधिकारी/कर्मचा-यांची माहिती विवरण पत्र 'ब' मध्ये देण्यात यावी.**

आपले कार्यालयाचे आस्थापनेवर काम करीत असलेले कर्मचारी व अधिकारी यापैकी कोणीही दिनांक **०१-०१-२०२७ ते ३१-१२-२०२७** या कालावधीत वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण **करीत असतील असे अधिकारी व कर्मचारी या माहितीतून वगळल्या गेल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.**

तसेच विवरण पत्रात आवश्यक ती माहिती दिल्यानंतर माहिती खाली आहरण व संवितरण अधिका-यांनी खालील प्रमाणे प्रमाणपत्र द्यावे.

" वर दिलेल्या माहिती व्यतिरिक्त या कार्यालयाच्या आस्थापनेवर काम करीत असलेले अधिकारी व कर्मचारी यापैकी कोणीही दिनांक **०१-०१-२०२७ ते ३१-१२-२०२७** या कालावधीत आपल्या वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण करीत नाहीत अथवा या अगोदरच पूर्ण झाली नाहीत."

उपरोक्त माहिती कोणत्याही परिस्थितीत दिनांक **३० नोव्हेंबर २०२५** पर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल याबाबत दक्षता घ्यावी.

(टिपः विद्यापीठ सेवेत कार्यरत असतांना एखाद्या स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास तशी सूचना या कार्यालयास देण्यात यावी.)

सहपत्र : विवरणपत्र 'अ' व 'ब'

उपकुलसचिव(आस्था)
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.

# विवरण पत्र 'अ'
## सेवानिवृत्ती वेतन कक्ष

विद्यापीठ सेवेत असणा-या कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यास वयाला दिनांक **०१/०१/२०२७ ते ३१/१२/२०२७** या कालावधीत वयाची ५५ (पंचावन्न) वर्षे पुर्ण होत असतील किंवा अगोदच पूर्ण झाली असतील अशा कर्मचा-यांची माहिती.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे संपूर्ण नांव जसे -नांव, वडीलांचे नांव आडनांव | हुद्दा व विषय (पदनाम पुर्ण लिहण्यात यावे) | वेतनश्रेणी | सेवा पुस्तकानुसार जन्म तारीख व ती कोणत्या आधारावर नोंदली आहे. | शासन सेवेत परत जाण्याचा विकल्प दिला आहे काय ? | सर्व कर्मचा-यांचे बाबतीत वयाला ५५ (पंचावन्न) वर्षे पूर्ण होण्याची अथवा झाल्याची तारीख | विद्यापीठ परिपत्रक क्र. बीजीजी/१२७२, दिनांक १२/९/१९७२ नुसार जन्म तारीख बदल करण्याचा अर्ज केला असल्यास कोणत्या पत्रानुसार या कार्यालयास सादर केला आहे. | कर्मचा-याचे आस्थापना कार्यालयाचे नांव | कर्मचारी प्रत्यक्षात काम करीत असलेल्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

वर दिलेल्या माहिती व्यतिरिक्त या कार्यालयाच्या आस्थापनेवर काम करीत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यापैकी कोणीही दिनांक **०१-०१-२०२७ ते ३१-१२-२०२७** या कालावधीत आपल्या वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण करीत नाहीत अथवा या अगोदरच पूर्ण झाली नाहीत.''

आहरण व संवितरण अधिका-याची सही
व कार्यालयाचा शिक्का दिनांकासह

55 Yrs Proforma

# विवरण पत्र 'ब'

## सेवानिवृत्ती वेतन कक्ष

दिनांक ०१ नोहेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यास वयाला दिनांक ०१/०१/२०२७ ते ३१/१२/२०२७ या कालावधीत वयाची ५५ (पंचावन्न) वर्षे पुर्ण होत असतील किंवा अगोदच पूर्ण झाली असतील अशा कर्मचा-यांची माहिती.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे संपूर्ण नांव जसे -नांव, वडीलांचे नांव आडनांव | हुद्दा व विषय (पदनाम पुर्ण लिहण्यात यावे) | वेतनश्रेणी | सेवा पुस्तकानुसार जन्म तारीख व ती कोणत्या आधारावर नोंदली आहे. | शासन सेवेत परत जाण्याचा विकल्प दिला आहे काय ? | सर्व कर्मचा-यांचे बाबतीत वयाला ५५ (पंचावन्न) वर्षे पूर्ण होण्याची अथवा झाल्याची तारीख | विद्यापीठ परिपत्रक क्र. बीजीजी/१२७२, दिनांक १२/९/१९७२ नुसार जन्म तारीख बदल करण्याचा अर्ज केला असल्यास कोणत्या पत्रानुसार या कार्यालयास सादर केला आहे. | कर्मचा-याचे आस्थापना कार्यालयाचे नांव | कर्मचारी प्रत्यक्षात काम करीत असलेल्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

वर दिलेल्या माहिती व्यतिरिक्त या कार्यालयाच्या आस्थापनेवर काम करीत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यापैकी कोणीही दिनांक **०१-०१-२०२७ ते ३१-१२-२०२७** या कालावधीत आपल्या वयाची ५५ (पंचावन्न) वर्ष पूर्ण करीत नाहीत अथवा या अगोदरच पूर्ण झाली नाहीत.''

आहरण व संवितरण अधिका-याची सही
व कार्यालयाचा शिक्का दिनांकासह